# संपादकीय

## बुडती हे जन न देखवे डोळा

भारतात निवडणुकांचा धुरळा आता खाली बसला आहे. भारतीयांनी राजकीय क्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासून मोठी धुमश्चक्री अनुभवली. कोणताही महत्त्वाचा मुद्दा घेउन ही निवडणूक लढवली गेली नाही. सत्ताधारी पक्षाकडेदेखील विशेष असे काही भारतीय लोकांपुढे आणण्यासारखे नव्हते. रोजगारनिर्मिती, शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी - ज्याला मोदी सरकार या रूपात भारतीय जनता पक्षाने पुढे आणले - सरकारला अपयश आलेले आहे.

सर्वसामान्यांचा भारत अभूतपूर्व अशा अरिष्टातून जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भारताचे अनेक पातळ्यांवरील अपयश हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सिद्ध झालेले आहे. साक्षात जागतिक बँकेच्या अहवालानुसार जगातील सर्वाधिक गरीब लोक हे भारतात राहतात. युनेस्कोच्या अहवालानुसार जगातील सर्वाधिक निरक्षर हे भारतात राहतात. राष्ट्रीय नमूना पाहणी कार्यालयाच्या पाहणीत असे आढळले की, भारतात शाळाबाह्य मुला-मुलींची संख्या ८ कोटींपेक्षा जास्त आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जाहीर केलेल्या आंतरराष्ट्रीय स्त्री-पुरुष भेद निर्देशांकात भारताचे स्थान हे १०८वे आहे. जगातील सर्वाधिक बेघर असलेल्या लोकांची संख्या असलेल्या देशांमध्येदेखील भारताचे स्थान वर आहे. जगातील सर्वाधिक भुकेलेल्या लोकांच्या क्रमवारीत जगातील ११९ देशांमध्ये भारताचे स्थान हे १०३वे आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी विकास निर्देशांकामध्ये जगातील १८९ देशांमध्ये भारताचे स्थान १३०वे आहे. लेबर ब्युरो स्टॅटिस्टिक्सनुसार जगातील सर्वाधिक बेरोजगार भारतात आहेत. सरकारच्याच आकडेवारीनुसार जून २०१८मध्ये भारतात गेल्या ४५ वर्षांमधील सर्वाधिक बेरोजगार होते. राष्ट्रवादी विचारांचे सरकार आल्यानंतरही भारतात रोज ४५ शेतकरी आत्महत्या करीतच होते. थोडक्यात, भारतीय जनतेने गाठलेला विपन्नावस्थेचा थर हा फारच खालचा आहे. सामान्यांच्या जीवनावर आलेली ही सर्वव्यापी अवकळा ही खरोखरच अभूतपूर्व आहे.

अशा समाजात मतदानावर अधिष्ठित असलेली लोकशाही हा मोठा आधार असू शकतो. मतदानाच्या माध्यमातून जनतेने आपल्या हिताचे सरकार निवडून देणे अपेक्षित असते. पण प्रत्यक्षात असे घडतेच असे नाही. जनतेने विवेकाच्या आधारे योग्य ते सरकार निवडण्यात यश येण्यापेक्षा प्रस्थापित पक्षांना जनतेच्या विवेकाचा ताबा घेण्यात यश येत आहे. भारताच्या लोकशाहीस हे घातक आहे.

अनैसर्गिक असलेले वास्तव हे नैसर्गिक वाटावे, अशा हेतूने विषमतेने ग्रस्त असलेल्या समाजात धोरणे आखली जातात. फॅसिस्ट विचारसरणीचे पक्ष अशावेळी हजार हातांच्या ऑक्टोपसाप्रमाणे कार्यरत होतात. प्रचारयंत्रणा प्रभावीपणे राबविणे, ही अशा पक्षांची खासियत असते. जनतेची दिशाभूल करण्यासाठी ते अतिशय खालची पातळी गाठू शकतात. २०१९च्या निवडणुकीत हे उघडपणे दिसून आले.

जगातील सर्वात मोठ्या असलेल्या या २०१९च्या निवडणुकीतून जनतेशी संबंधित असलेले खरेखुरे मुद्दे हरविले होते. विरोधी पक्षांना हे मुद्दे चर्चेत आणण्यात यश आले नाही; तर सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने भ्रांत मुद्दे चर्चेत आणण्यात यश मिळविले. विरोधकांमध्ये एकजूट नसणे, हे या निवडणुकीचे विशेष

असे वैशिष्ट्य होते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांमध्ये नीट संवाद नव्हता. जनता दल (धर्मनिरपेक्ष) या पक्षाने काँग्रेसला पाठिंबा दिला. सोळाव्या लोकसभेत गुजरातमधून एकही खासदार नसलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात काँग्रेससोबत युती करून गुजरातमधून काँग्रेसविरोधात २६ उमेदवार उभे केले; तर सध्या महाराष्ट्रात एकही खासदार वा आमदार नसलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या वंचित बहुजन आघाडीने सर्व ४८ जागी उमेदवार उभे केले. कम्युनिस्टांनी कुठे स्वत:चे उमेदवार उभे केले तर कुठे काँग्रेसला छुपा पाठिंबा दिला तर कुठे वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा दिला. विरोधकांमधील हा बेबनाव भारतीय जनता पक्षाच्या पथ्यावर पडणार आहे, हे स्पष्टच आहे.

नि:पक्षपणे निवडणूक प्रक्रिया राबविली जाणार नाही, अशी भीती या निवडणुकीत आधीपासूनच अनेकांना वाटत होती. शेवटी घडलेही असेच. आचारसंहिता लागू होण्याच्या एक दिवस आधी नरेंद्र मोदींवर चित्रपट प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केला गेला. योग्य अशा रितसर परवानगीशिवाय नमो नावाची दूरचित्रवाणी वाहिनी सुरू केली गेली. भारताच्या सैन्यदलाचा वापर निवडणुकीत न करण्याविषयीच्या स्पष्ट सूचना निवडणूक आयोगाने देऊनही सैन्यदलाचा उल्लेख राजकीय सभांमध्ये सर्रास केला गेला. योगी आदित्यनाथांनी भारतीय सैन्यदलाला 'मोदीजीकी सेना' म्हटले. यासंदर्भात ६६ निवृत्त अधिकाऱ्यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहून निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे पत्र लिहिले होते. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता अशा पद्धतीने प्रश्नांकित होणे हे, भारताच्या लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे.

अशा अटीतटीच्या वेळी भारतीय मतदार काय भूमिका घेतात, हे निकालानंतरच स्पष्ट होईल. ६८.८४ टक्के भारतीय नागरिक ग्रामीण भारतात राहतात. गेल्या काही वर्षांमध्ये शेतीतील अरिष्टाने तीव्र रूप धारण केले आहे. सततचा दुष्काळ, वाढते कर्जबाजारीपण आणि शेतमालाला रास्त भाव न मिळणे यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर पिळवटून निघाले आहेत. ग्रामीण भारतातील मतदार काय भूमिका घेतात हे कळीचे असणार आहे. ग्रामीण भारतातील मतदारांना कमी लेखूनही चालणार नाही. २००४च्या लोकसभा निवडणुकीत 'शायनिंग इंडिया' असा प्रचार करूनही राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विरोधात मतदारांनी कौल टाकला होता, हे विसरता येणार नाही. तसेच २०१८मध्ये झालेल्या मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक या राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्येदेखील जनतेच्या या विवेकाचा प्रत्यय आला होता.

याउपरही जर लोक खोट्या आश्वासनांना भुलले तर जॉर्ज बर्नार्ड शॉ म्हणाले त्याप्रमाणे, लोकशाहीत लोकांना त्यांच्यापेक्षा अधिक पात्र राज्यकर्ते मिळत नसतात. म्हणजे, लोकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे शासक मिळतात. परंतु, शेवटी जनतेच्या 'संमती'चे व्यवस्थापनदेखील राज्यकर्ता वर्गच करीत असतो. हे राजकारण इतके बेमालूमपणे सुरू असते की, इटली आणि जर्मनीमध्ये लोक मुसोलिनी आणि हिटलरच्या विचारांचे चाहते आणि वाहक कसे बनले, हे त्यांनाही दीर्घकाळ उमगले नाही. एडवर्ड एस. हर्मन आणि नोऑम चॉम्स्की यांनी याला 'संमतीची निर्मिती' असे म्हटले होते. मध्ययुगीन काळात समाजाची दैना बघून तुकारामासारखे संतकवी अस्वस्थ होत असत. आता, लोकांच्या हातात मतदानासारखे अमोघ शस्त्र आहे. तरीही, त्यांची दैना दशकानुदशके संपत नसेल तर दाद कुणाकडे मागावी हा प्रश्न कदाचित अनुत्तरित राहील.

●

परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावेत.